मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका मतदानासाठी यंत्रणा सज्ज!

## 2067 केंद्रांवर होणार मतदान, 126 जागांसाठी मतदान; 692 उमेदवार रिंगणात

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी उद्या (गुरुवारी) २ हजार ६७ केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदानासाठी ६ हजार ५०० बॅलेट युनिट आणि २ हजार ६७ कंट्रोल युनिट वापरले जाणार आहेत. यासाठी १० हजार ३३५ कर्मचारी असणार आहेत. सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी ३२ प्रभागांत १२८ जागा असून, ६९२ उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक ६ व १० मधून अनुक्रमे भाजपचे रवी लांडगे आणि सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे १२६ जागांसाठी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी १० हजार ३३५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्राध्यक्ष, ३ मतदार अधिकारी, १ शिपाई असेल. केंद्रांकरिता मतदान साहित्याचे किट वाटप करण्यात आले आहे.



असे रोखणार दुबार मतदान

शहरात ९२ हजार दुबार मतदार आहेत. या मतदारांच्या यादीनुसार महापालिका कर्मचाऱ्यांनी संबंधित मतदारांच्या घरी जाऊन तो मतदार कोठे मतदान करणार आहे, याचा अर्ज भरून घेतला आहे. त्या मतदाराचे नाव दुसऱ्या ठिकाणी असल्यास तेथे मतदान केले म्हणून शिक्का मारला जाणार आहे.

**मतदान केंद्रावर मोबाइल नेण्यास मनाई**

मतदाराला बूथ स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सहाय्याने घरोघरी जाऊन 'स्लिपांचे' वाटप करण्यात आले आहे. मतदान केंद्रांमध्ये मोबाइल घेऊन जाता येणार नाही. मतदान केंद्राबाहेर मतदारांचे मोबाइल ठेवण्यासाठी अंगणवाडी सेविकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**मतमोजणी शुक्रवारी**

मतमोजणी शुक्रवारी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार असून आठ ठिकाणी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीच्या १६ ते २१ फेऱ्या होणार आहेत. मतदान यंत्रातील मोजणीसाठी १६ आणि टपाली मतांच्या मोजणीसाठी चार टेबल असणार आहेत. एकाचवेळी सर्व प्रभागातील मतमोजणी सुरु होणार असून दुपारी बारा वाजेपर्यंत पहिला निकाल लागणार आहे.

**मतमोजणी होणार आठ ठिकाणी**

प्रभाग क्र. १०, १४, १५, १९ : स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, निगडी प्राधिकरण, सेक्टर क्र. २६

प्रभाग क्र. १६, १७, १८, २२ : ऑटो क्लस्टर सभागृह येथील छोटा हॉल, चिंचवड,

प्रभाग क्र. २, ६, ८, ९ : संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी

प्रभाग क्र. २५, २६, २८, २९ : ड क्षेत्रीय कार्यालय, औंध-रावेत बीआरटी रोड, रहाटणी

प्रभाग क्र. ३, ४, ५, ७ : कबड्डी प्रशिक्षण संकुलाच्या तळमजल्यावर स्ट्राँग रूम व पहिल्या मजल्यावर मतमोजणी, अंकुशराव लांडगे नाट्यगृहाच्या मागे, भोसरी

प्रभाग क्र. १, ११, १२, १३ : घरकुल चिखली टाऊन हॉल, सेक्टर क्र. १७ व १९ दरम्यान, स्पाईन रोड शेजारी, चिखली

प्रभाग क्र. २१, २३, २४, २७ : स्व. शंकर (अण्णा) गावडे स्मृती कामगार भवन, थेरगाव

प्रभाग क्र. २०, ३०, ३१, ३२ : महापालिका कासारवाडी भाजी मंडई (दुमजली हॉल)

### मतदान केंद्रावर विविध सुविधा

» प्रत्येक मतदान केंद्रावर वैद्यकीय सुविधा देण्यासाठी डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पिण्याचे पाणी, अपंगांसाठी व्हिलचेअर व्यवस्था, प्रतिक्षा कक्ष तसेच प्रथमोपचार पेटीसह इतर सुविधा देण्यात येणार आहेत.

### 17 लाख मतदार बजाविणार हक्क

» एकूण मतदारसंख्या : १७, १३, ८९१
» पुरुष : ९,०४,८१५
» महिला : ८,०७, १३९
» इतर : १९७
» अनुसूचित जाती : २,७३,८१०
» अनुसूचित जमाती : ३६,५३५

# ट्रकच्या धडकेत दुचाकीवरीलदोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू

## काळेवाडीतील पेट्रोल पंपाजवळ भीषण दुर्घटना; संक्रांती दिवशीच नियतीचा घाला

**पिंपरी | प्रतिनिधी**

भरधाव ट्रकने दुचाकीवरून जाणाऱ्या दोनसख्ख्या बहिणींना धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघी बहिणींचा दुर्दैवीमृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि. १४) दुपारी काळेवाडी येथील धनगर बाबामंदिरासमोरील पेट्रोल पंपाजवळ घडली. ऐन मकरसंक्रांती दिवशी दोन्हीसख्ख्या बहिणींचा अपघाती मृत्यु झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

ऋतुजा पांडुरंग शिंदे (वय २४) आणि नेहा पांडुरंग शिंदे (वय २०, रा.पुनावळे) अशी मृत्यू झालेल्या बहिणींची नावे आहेत. ट्रकचालक जितेंद्रनिराले (रा. खलघाट, जि. धार, मध्यप्रदेश) याला काळेवाडी पोलीसांनी अटककेली आहे.

काळेवाडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र बहिरट यांनीयाबाबत माहिती दिली. पुनावळे येथील शिंदे



कुटूंबाचा मिरची कांडपचाव्यवसाय आहे. त्यांना ऋतजा आणि नेहा या दोनच मुली होत्या. ऋतुजा हिनेएलएलबीचे शिक्षण पूर्ण केले होते. तर, नेहा ही कॉलेजला जाते. बुधवारीऋतुजा आणि नेहा या काही कामानिमित्त दुचाकीवरून चालल्या होत्या. काळेवाडीयेथे धनगर बाबा मंदिरासमोरील पेट्रोल पंपाजवळ भरधाव ट्रकने त्यांच्यादुचाकीला धडक दिली. धडकेनंतर दोघीही गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीनेरुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आयशर ट्रकचालकाला त्वरीत ताब्यात घेण्यात आले. ऐन मकरसंक्रांती दिवशी दोन्हीसख्ख्या बहिणींचा अपघाती मृत्यु झाल्याने त्यांच्या कुटूंबावर दुःखाचाडोंगर कोसळला आहे. या दुर्घटनेमुळे पुनावळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यातयेत असून शिंदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# मतदान केंद्रांवर दिव्यांग व मतदारांसाठी विशेष सुविधा

## व्हीलचेअर, रॅम्प, स्वयंसेवकांची व्यवस्था; 453 व्हीलचेअर्सचे प्रभागनिहाय वाटप



> सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मतदानाच्या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांगासाठी विशेष सोयी-सुविधा पुरवण्यात आल्या असून, सर्व नागरिकांनी मतदानाचा अधिकार बजावून आपल्या संविधानिक कर्तव्याचे पालन करून लोकशाही प्रक्रिया बळकट करावी.
>
> **- ममता शिंदे,उप आयुक्त तथा नोडल अधिकारी, मतदार सोयी सुविधा व दिव्यांग मतदार कक्ष.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे मतदान दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या मतदार सोयी सुविधा व दिव्यांग मतदार कक्षाच्या वतीने शहरातील ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ३२ प्रभागांमधील सर्व मतदान केंद्रांवर विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

मतदान केंद्रांवर सर्व मतदारांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, शौचालयांची सुविधा तसेच दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांवर स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली असून, एकूण ४५३ व्हीलचेअर्स प्रभागनिहाय वाटप करण्यात आले आहेत. ज्या मतदान केंद्रांवर १० पेक्षा अधिक खोल्या आहेत, त्या ठिकाणी किमान दोन व्हीलचेअर्स उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.या सुविधांसाठी आरोग्य विभागाकडील कर्मचारी, मोरवाडी व कासारवाडी आयटीआय, डी. वाय. पाटील कॉलेज, महात्मा फुले कॉलेज, सिम्बॉसिस कॉलेज, भैरवनाथ ज्युनिअर कॉलेज येथील एन.एस.एस.चे विद्यार्थी, लाईट हाऊस प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, बालविकास प्रकल्प कार्यालयाकडील अंगणवाडी व बालवाडी शिक्षिका तसेच सक्षमा प्रकल्पाअंतर्गत कार्यरत महिलांची नेमणूक करण्यात आली आहे.

दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच, इतर मतदारांसाठीही मतदानाच्या दिवशी विविध विशेष सोयी सुविधा पुरवण्यात येणार आहेत. मतदारांचे मोबाईल जमा करून त्यांना टोकन क्रमांक देण्यासाठी आवश्यक टोकन व साहित्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्रांवरील गर्दी व्यवस्थापन व मतदारांच्या रांगा नियोजित पद्धतीने लावण्यासाठी एन.एस.एस.चे विद्यार्थी व इतर स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे. या सर्व सुविधांमुळे दिव्यांग नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच सर्व मतदारांना सुलभ, सुरक्षित व सुरळीतरीत्या मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

# 17 लाख 13 हजार मतदार बजविणार मतदानाचा हक्क

## मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज- आज 128 प्रभागातील उमेदवारांचे भवितव्य होणार मतपेटीत बंद



### मतदान साहित्य वाटप केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी

**» दरम्यान, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी महापालिका कार्यक्षेत्रातील ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय उभारण्यात आलेल्या मतदान साहित्य वाटप केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सुरू असलेल्या मतदान साहित्य वाटप प्रक्रियेचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची तपासणी करताना साहित्य वितरण वेळेत, सुयोग्य व शिस्तबद्ध पद्धतीने होत आहे का, याची खात्री त्यांनी करून घेतली. या पाहणी दरम्यान उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सुप्रिया डांगे, अर्चना तांबे, डॉ. दिप्ती सूर्यवंशी, अर्चना पठारे, हिम्मत खराडे,अनिल पवार, नितीन गवळी, पल्लवी घाटगे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे तसेच ८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह विविध कक्षांचे प्रमुख उपस्थित होते.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदान प्रक्रिया भयमुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यंत्रणा सज्ज असून मतदारांनी आपला संविधानिक हक्क बजावण्यासाठी उत्स्फुर्तपणे मतदान करून इतर पात्र मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले आहे.

महापालिका क्षेत्रातील एकूण मतदार संख्या १७ लाख १३ हजार ८९१ इतकी असून यामध्ये ९ लाख ५ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ स्त्रिया आणि १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १६ हा ७५ हजार १०५ मतदारांसह सर्वाधिक मतदारांचा प्रभाग ठरला आहे, तर प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वात कमी म्हणजे ३३ हजार ३३ मतदार आहेत. मतदारांच्या सोयीसाठी एकूण २ हजार ६७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

यामध्ये काही तात्पुरत्या स्वरूपात मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली असून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय त्याची संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय क्रमांक १ अंतर्गत ५२, कार्यालय क्रमांक २ अंतर्गत ५४, कार्यालय क्रमांक ३ अंतर्गत ३, कार्यालय क्रमांक ४ अंतर्गत सर्वाधिक १०८, कार्यालय क्रमांक ५ अंतर्गत २७, कार्यालय क्रमांक ६ अंतर्गत २२, कार्यालय क्रमांक ७ अंतर्गत २३ तसेच कार्यालय क्रमांक ८ अंतर्गत ३३ तात्पुरती मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. अशा प्रकारे महापालिका कार्यक्षेत्रात एकूण ३२२ तात्पुरत्या मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

मतदान केंद्रावर मतदारांना मोबाईल नेण्यास मनाई

मतदाराला त्याचे मतदान केंद्र, मतदार यादीतील आणि इतर आवश्यक माहिती देण्यासाठी स्लिपा महत्वाच्या आहेत. बूथ स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सहाय्याने घरोघरी जाऊन या स्लिपांचे वाटप करण्यात आले आहे. याशिवाय स्लिप वाटर करताना मतदान केंद्रांमध्ये मोबाईल घेऊन जाण्यास मनाई असल्याबाबत मतदारांना माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय सर्व मतदान केंद्रावर स्वयंसेवक यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्राबाहेर मतदारांचे मोबाईल ठेवण्यासाठी मैथिली व आंगणवाडी सेविकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी निश्चित केलेल्या ठिकाणी शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. ई. व्ही. एम फेरीसाठी स्वतंत्र टेबल असणार आहेत. तसेच टपाली मतमोजणीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीचा प्रत्येक फेरीनिहाय निकाल जाहिर करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय नियोजन करण्यात आले असून सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावर स्वतंत्र मिडीया सेलची व्यवस्था करण्यात येणार आहे.

# महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात वाहतूक बदल

## पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांमध्ये वाहतूक बदल लागू करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात वाहतूक बदल करण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतपेटी वाटप, वाहतूक, तसेच मतदान केंद्र परिसरात वाहतूक बदल करण्यात आले आहेत. अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता अन्य वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. १४ ते १६ जानेवारीदरम्यान वेगवेगळ्या भागांत वाहतूक बदल करण्यात आले आहेत.

'विमानतळ वाहतूक विभागांतर्गत फिनिक्स मॉलमागील रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. वाहनचालकांनी विमाननगर चौक, नगर रस्ता या मार्गाचा वापर करावा. विश्रामबाग वाहतूक विभागाअंतर्गत टिळक रस्त्यावरील पूरम चौक, टिळक चौक हा मार्ग वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे.

वाहनचालकांनी बाजीराव रस्ता, शास्त्री रस्ता या मार्गाचा वापर करावा. दत्तवाडी वाहतूक विभागातील ना. सी. फडके चौक (निलायम चित्रपटगृह), तसेच सारसबाग परिसरातील रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालाकंनी बाजीराव रस्ता, अप्पा बळवंत चौक या मार्गाचा वापर करावा. टिळक रस्त्याकडे येणारी वाहतूक देशभक्त केशवराव जेधे चौकातून (स्वारगेट) वळविण्यात येईल,' अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली. पुणे शहरात आगामी महापालिका निवडणुकीच्या धामधुमीत वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊ नये, यासाठी पुणे वाहतूक पोलिसांनी १४ ते १६ जानेवारी या कालावधीत विशेष नियमावली जाहीर केली आहे. सकाळी ६ ते सायंकाळी ७ या वेळेत शहरातील विविध भागांतील प्रमुख रस्ते बंद राहतील. पुणे शहरातील महत्त्वाच्या सहा वाहतूक विभागांतर्गत येणाऱ्या रस्त्यांवर हे बदल करण्यात आले आहेत. या काळात जड वाहने आणि खाजगी वाहनांना विशिष्ट ठिकाणी प्रवेशबंदी असेल.



### मार्केट यार्डातील घाऊक बाजार बंद

» महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजार गुरुवारी बंद ठेवण्यात येणार आहे. मार्केट यार्डातील फळ आणि भाजीपाला, गूळ-भुसार, केळी, फूल, पान बाजार बंद राहणार आहे. पेट्रोल पंप विभाग, वजनकाटा विभाग, तसेच मोशी, खडकी, मांजरी, उत्तमनगर, पिंपरी येथील उपबाजार बंद राहणार आहेत. शेतकऱ्यांनी गुरूवारी शेतीमाल विक्रीसाठी आणू नये, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीकडून करण्यात आले आहे.

### शहरातील विविध भागांमध्ये वाहतूक बदल

» बंद मार्ग: साने गुरुजी परिसराकडे जाणारा मुख्य मार्ग पूर्णपणे बंद राहील.

» पर्यायी मार्ग: वाहनचालकांनी हडपसर वेस्ट अमरधाम स्मशानभूमी मार्ग किंवा माळवाडी डी.पी. रस्त्याचा वापर करावा. तसेच हडपसर गाडीतळ येथून संजीवनी हॉस्पिटल डी.पी. रस्त्याने सिद्धेश्वर हॉटेलकडे जाता येईल.

» बंद मार्ग: पॉवर हाऊस चौक ते बालाजी चौक, संत कबीर चौक ते क्वार्टर गेट चौक आणि रामोशी गेट ते जुना मोठा स्टँड.

» पर्यायी मार्ग: वाहनचालकांनी शांताई हॉटेल, क्वार्टर गेट चौक, बाहुबली चौक आणि 'सेव्हन लव्हज' चौक या व्यापारी मार्गाचा वापर करावा.

» बंद मार्ग: फिनिक्स मॉलच्या मागील बाजूचा रस्ता, सॉलिटेअर इमारत आणि निको गार्डन परिसरातील अंतर्गत रस्ते पूर्णपणे बंद राहतील.

» पर्यायी मार्ग: विमान नगर चौक, श्रीकृष्ण हॉटेल चौक आणि दत्त मंदिर चौक या मार्गे वाहतूक वळवण्यात आली आहे.

» बंद मार्ग: नॉर्थ मेन रोड (लेन क्रमांक 'सी') ते पाणीपुरवठा केंद्र, बंडगार्डन घाट आणि महात्मा गांधी चौक ते मौलाना अब्दुल कलाम आझाद स्मारक.

» पर्यायी मार्ग: कोरेगाव पार्क जंक्शन ते एबीसी फार्म या मुख्य रस्त्याचा वापर करून नागरिक आपले इच्छित स्थळ गाठू शकतात.

» विश्रामबाग: पुरम चौक ते टिळक चौक दरम्यानची वाहतूक बंद असेल. नागरिकांनी शास्त्री रस्त्याने दांडेकर पुलामार्गे प्रवास करावा.

» दत्तवाडी: बाजीराव रस्त्यावरील सनस पुतळा ते ना. सी. फडके चौक आणि सारसबाग खाऊ गल्ली मार्ग बंद असेल. येथील वाहतूक अप्पा बळवंत चौक (ABC) आणि पुरम चौकातून वळवण्यात आली आहे.

# मनपा निवडणूकीच्या मतदानाकरिता भरपगारी सुट्टी – कामगार उपआयुक्त निखील वाळके

## कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनानी भरपगारी सुट्टी तथा सुट्टी देणे शक्य नसल्यास सवलत देण्यात यावी

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ करीता मतदारांना मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता १५ जानेवारी २०२६ रोजी कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनानी भरपगारी सुट्टी तथा सुट्टी देणे शक्य नसल्यास सवलत देण्यात यावी, असे आवाहन कामगार उपआयुक्त निखील वाळके यांनी केले आहे.




उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या ३० डिसेंबर २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार कामगार विभागांतर्गत येणा-या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने (उदा खाजगी कंपन्यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदी.) मधील कार्यरत अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना भरपगारी सुट्टी देण्यात यावी तसेच अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तेथे दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत सूचित केले आहे.

कामगार विभागातंर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने व दुकाने मालकांनी, व्यवस्थापनाने परिपत्रकातील निर्देशाचे तंतोतंत पालन करण्याची खबरदारी घ्यावी. आपल्या आस्थापनेतील अधिकारी, कर्मचारी, कामगार यांच्याकडून मतदानाकरीता भरपगारी सुट्टी अथवा सवलत न मिळाल्याची तक्रार कामगार कार्यालयास प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनेविरुध्द मा. निवडणूक आयोग व शासनाने निर्देशित केल्यानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

यासंदर्भात अधिक माहिती व तक्रारीकरिता सहाय्यक कामगार आयुक्त प्रविण बा. जाधव – ९५२९६११८०७, ग. स. शिंदे-९७३०१२११५२, द. दा. पवार-९८२२७३३३७०. सु. तु. शिर्के-७७७५९६६६०६, कै. ल. मुजमुले-९८२३९९७७२२ आणि अधीक्षक व. पं. सोनंदकर-९९६०५५७११६ यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन कामगार उपआयुक्त निखील वाळके यांनी केले आहे.

### सुट्टी अथवा सवलत न दिल्यास तक्रार कुठे करावी..

» जिल्ह्यातील सर्व आस्थापना, कारखाने व दुकाने यामध्ये काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, कामगार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील निवडणूकीच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी अथवा सवलत न दिल्यास अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे विभाग व कामगार उप आयुक्त कार्यालयाच्या alcpune5@gmail.com व dycl2021@gmail.com या ई-मेल पत्त्यावर आस्थापनेचे नाव, जबाबदार अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करुन तक्रार दाखल करावी.

# पाटसच्या आखाड्यात कोणाचा गुलाल; जिल्हा परिषदेसाठी नेत्यांची 'फिल्डिंग' सुरू

## पंचायत समितीसाठी पाटस आणि कुरकुंभ गणात इच्छुकांची गर्दी; 'राम-राम' आणि 'नमस्कार'चा जोर वाढला, मतदारांच्या भेटीगाठींवर भर.

**पुणे | प्रतिनिधी**

पाटस जिल्हा परिषद गटातून इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली असून पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी फिल्डिंग सुरू केली आहे. निवडणुकीच्या रिंगणात आजी, माजी व नवीन उमेदवार गावातील लोकांशी संपर्क साधत आहेत, दौंड तालुक्याचे राजकारण आणि अर्थकारण असलेल्या पाटस-कुरकुंभ गटात सर्वसाधारण महिला आरक्षण आहे.

पंचायत समितीसाठी पाटस आणि कुरकुंभ गण सर्वसाधारण आरक्षित आहे. आरक्षित गट- गणांसाठी इच्छुकांनी कंबर कसली आहे.राज्यातील जिल्हा परिषद निवडणूकीचे बिगुल वाजले आहे. दौंड तालुक्यात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात मुख्य लढत पाहण्यास मिळणार आहे. भाजपकडून आमदार राहुल कुल आणि राष्ट्रवादीकडून माजी आमदार रमेश थोरात यांनी प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

दौंड तालुक्यात एकूण जिल्हा परिषद गट सात असून पंचायत समितीसाठी एकूण १४ गण आहेत. पाटस कुरकुंभ जिल्हा परिषदेच्या गटातून पाटस, कुरकुंभ, मळद, पांढरेवाडी, जिरेगाव, कुसेगाव, रोटी, हिंगणीगाडा, रावणगाव, वासुंदे, नंदादेवी, कौठडी व बिरोबावाडी या गावांचा समावेश करण्यात आला आहे.

पाटस गटातून जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या पाटस गटातून इच्छुक उमेदवारांनी राजकीय वातावरण तापवले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी अनेक इच्छुकांनी बाशिंग बांधून दौरे सुरू केले आहेत. निवडणूक रिंगणात उतरणाऱ्या नवीन उमेदवारांमध्ये अनिश्चितेचे वातावरण आहे.

अनेक नवीन युवा उमेदवार आतापासूनच तयारीला लागले असून लोकांना नमस्कार, रामराम करीत आहे. गावातील दशक्रिया विधी पूर्ण होईपर्यंत स्वतः हजर राहणे, समोरासमोर कामे करणेही सुरू केले आहे. भेटीगाठी वाढल्या आहेत. आजी- माजी पदाधिकारी उमेदवारीसाठी कोणत्याही पक्षात जाऊ शकते. तोडाफोडीचे समीकरण निवडणुकीत होणार असे दिसत आहे.

पक्षाची उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष लढण्याची तयारी अनेकांनी सुरू केली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी या पक्षाचे उमेदवार रिंगणात उतरणार आहेत. पक्षाची उमेदवारी मिळाले नाही, तर गट, आघाडी स्थापन करून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुक लढण्याची तयारी चालविली आहे.




### गट- गणांतून प्रबळ नावे चर्चेत

» कुरकुंभ गटातून पांढरेवाडी येथील स्वप्नील शितोळे, रावणगावचे माजी सरपंच गेणदेव माणिक आटोळे यांनी पंचायत समितीच्या उमेदवारीसाठी इच्छा व्यक्त केली. भाजपच्या कुल गटाकडून पाटसच्या जिल्हा परिषदेच्या गटातून माजी जिल्हा परिषद सदस्य वैशाली वाबळे, प्राची शितोळे, मीनाक्षी देशमुख, सई शितोळे हे उमेदवार इच्छुक आहेत. पाटस पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी पाटस गणातून जयंत पाटील, संभाजी बापू खडके, प्रताप भागवत हे उमेदवार इच्छुक आहेत तर पंचायत समितीच्या कुरकुंभ गणातून राहुल भोसले, राहुल शितोळे, कालिदास ननावरे, बापू भागवत हे उमेदवार इच्छुक आहेत.

### इच्छुकांची सुप्त आकांक्षा बळावली

» जिल्हा परिषद आणि दौंड पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या थोरात गटाकडून माजी सभापती आशा नितीन शितोळे, ज्योती शिवाजी ढमाले, पूनम सुशील शितोळे, ग्रामपंचायत सदस्य शीतल गणेश चव्हाण हे उमेदवार जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उडी घेण्यासाठी तयार झाले आहेत. पंचायत समितीच्या पाटस गणातून थोरात गटाकडून पाटस येथील ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील बाळासाहेब भागवत, कुसेगाव येथील सागर बाळासाहेब शितोळे यांनी पक्षाची उमेदवारी मिळण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

### निवडणुक लढण्याची तयारी

» पक्षाची उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष लढण्याची तयारी अनेकांनी सुरू केली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी या पक्षाचे उमेदवार रिंगणात उतरणार आहेत. पक्षाची उमेदवारी मिळाले नाही, तर गट, आघाडी स्थापन करून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुक लढण्याची तयारी चालविली आहे.

# 25 गावांचा संपर्क लोकसहभागातून जोडला! स्वखर्चातून पुलाचे काम पूर्ण

## गुंजवणी नदीवरील पूल कोसळून 20 दिवस उलटले; सरकारी मदतीची वाट न पाहता तरुणांनी स्वत:च हाती घेतल्या कुदळ-फावडी.

**पुणे | प्रतिनिधी**

मागील वर्षी (दि.२०) डिसेंबर रोजी गुंजवणी नदीवरील पूल कोसळल्यानंतर राजगड-वेल्हे परिसरातील २५ गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला होता.अशा गंभीर परिस्थितीत प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजनांची अपेक्षा असताना, प्रत्यक्षात निर्णय प्रक्रियेतील विलंब आणि उदासीनता ठळकपणे दिसून आली.



परिसरातील गावकऱ्यांनी लोकसहभागातून स्वखर्चातून पुलाचे काम पूर्ण झाल्याने पुन्हा संपर्क पूर्वपदावर आले आहे.गुंजवणी नदीवरील पूल कोसळल्यानंतर राजगड-वेल्हे परिसरातील २५ गावांतील दळणवळण ठप्प झाले, रुग्णवाहिकांचा मार्ग बंद पडला. विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत झाले, तर व्यापारी व शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

अखेर प्रशासन थांबले, पण गावकरी न थांबता कार्यरत राहिले. परिसरातील तरुणांनी पुढाकार घेत लोकवर्गणी व स्वखर्चाच्या माध्यमातून पर्यायी पूल व रस्ता उभारला. पंचवीस गावांचा तुटलेला संपर्क पुन्हा सुरू केला. मोरी, दगड, माती व मुरूम टाकून हा मार्ग रहदारीसाठी सुरक्षित केला आहे. हा रस्ता दोन्ही तालुक्यांना जोडणारा, व्यापार, पर्यटन व आपत्कालीन सेवांसाठी महत्त्वाचा दुवा ठरतो.

संपूर्ण घटनेत पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेचे भावी नेते, लोकप्रतिनिधी म्हणून पुढे येणारे दावे करणारे अनेक चेहरे मात्र लवकरात लवकर लक्ष देताना दिसले नाहीत. पूल कोसळून कित्येक दिवस उलटूनही ठोस हस्तक्षेप न झाल्याने जनतेत नाराजी वाढली असून, या नेतृत्वाकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलत आहे. आपत्तीच्या वेळी जे सोबत उभे राहत नाहीत, त्यांना मताच्या वेळी जनता कशी पाहील ?असा प्रश्न आता उघडपणे चर्चेत आहे. या लोकाभिमुख उपक्रमावेळी राजगडचे तहसीलदार निवास ढाणे आणि वेल्हेचे सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेवते यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन व सहकार्य केले. आरसीसी मोरीसाठी प्रकाश वाढे यांचे मोलाचे योगदान लाभले.

### लोकशक्तीचा आदर्श, प्रशासनास थेट सवाल

» या पर्यायी पुलामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला, तरी हा कायमस्वरूपी उपाय नाही. प्रत्येक पावसाळ्यात धोका पुन्हा उभा राहू शकतो. त्यामुळे कौतुकाचे शब्द नकोत-कायमस्वरूपी पूल हवा, अशी एकमुखी मागणी नागरिकांकडून होत आहे. आज तरुणांनी स्वखर्चातून माणुसकीचा पूल उभा केला. उद्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जबाबदारीचा पूल उभारणार का? हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरितच आहे.